# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**" स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या पंचवार्षिक बृहत आराखडयातील शै.व. २०२१–२०२२ या वार्षिक योजनेमध्ये नवीन ठिकाणे व नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम याचा समावेश करणेबाबत"**

## जाहीर प्रगटन

सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी शिक्षण तज्ज्ञ, संस्था चालक, उदयोगपती प्राचार्य, संशोधन संस्था प्रमुख, शिक्षक वृंद यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत (नांदेड, लातुर, हिंगोली, परभणी या जिल्हयातील) कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापनशास्त्र, ललित कला तसेच रोजगाराभिमुख, कौशल्य विकास अभ्यासक्रम व नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमाचे नवीन महाविद्यालये सुरु करणेबाबत तसेच सध्या कार्यरत असलेल्या संलग्न महाविद्यालयात अभ्यासक्रमात नविन विषय, अभ्यासक्रम इ. साठी विविध घटकाकडून सूचना मागविण्यांत येत आहेत. पंचवार्षिक बृहत आराखडयातील (वार्षिक योजना २०२१–२०२२) विविध अभ्यासक्रम व कार्यक्षेत्रातील ठिकाणे समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी नवीन महाविद्यालये, पारंपारिक किंवा अपारंपारिक अभ्यासक्रमाबाबत प्रस्तावित ठिकाणांच्या शैक्षणिक गरजा, भौगोलिक परिसर, लोकसंख्या, सामाजिक परिस्थिती, बदलते तंत्रज्ञान, भविष्यातील गरज तसेच आदिवासी, डोंगराळ/दुर्गम भागातील गरजा व अडचणी यांचा विचार करुन व्यवसाय तथा रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना प्राधान्य देत आपल्या सविस्तर सूचना, माहिती, प्रस्तावित ठिकाण (स्थळ) याबाबत सर्व तपशीलासह अर्ज सादर करावेत. (महाविद्यालय स्थळ, अभ्यासक्रम, विषय सुरु करावयाच्या सुचना )

मा.कुलसचिव, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड यांचेकडे **दि.२०/०७/२०२०** पर्यंत प्रत्यक्ष अथवा ई–मेल दवारे (affi.srtmun@gmail.com) अर्ज (सर्व तपशीलासह) सादर करण्यात यावा. बृहत आराखडयातील वार्षिक योजनेचा त्वरीत तपशील, 'उच्च शिक्षणाचा बृहत आराखडा–सर्वसाधारण निकष' समिती अहवाल व अनुषांगिक माहिती विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेस्थळावर उपलब्ध आहे.

**टिप:** बृहत आराखडयातील वार्षिक योजने बाबत वेळावेळी दिल्या जाणा–या सूचना यापूढे केवळ विद्यापीठाच्या संकेतस्थळावरच (www.srtmun.ac.in) प्रसिध्द करण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

संदर्भ क्र. शैक्षणिक/संलग्न/२०२०–२१/262.
दिनांक : ०८/०७/२०२०

कुलसचिव,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,
नांदेड